आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२ सप्टेंबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- सेमिकॉन इंडिया २०२५ चं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, भारताची मायक्रोचीप जगाला दिशा देईल असा व्यक्त केला विश्वास

- मराठा आंदोलकांकडून मुंबईतले रस्ते मोकळे करायला सुरुवात, मागण्या मान्य झाल्याशिवाय आझाद मैदान न सोडण्यावर मनोज जरांगे ठाम

- अफगाणिस्तानातल्या भूकंपबळींची संख्या ८०० च्या वर, तर सुदानमधे भूस्खलनात एक हजारपेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू

**आणि**

- यूएस ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत नॅओमी ओसाका हिची कोको गॉफ हिच्यावर मात

**<><><><>**

सेमीकंडक्टरमध्ये जगाचा विकास करण्याची शक्ती असून भविष्यात भारताची मायक्रो चीप जगाला दिशा देईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीतल्या यशोभूमी इथं आज सेमिकॉन इंडिया २०२५ चं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, तेव्हां ते बोलत होते. सेमीकंडक्टर उद्योगाच्या विकासासाठी जग भारतावर विश्वास ठेवतं असं ते म्हणाले. जागतिक चिप बाजारपेठेत भारताच्या वाढत्या प्रभावावर त्यांनी भर दिला. २१ व्या शतकात, या लहान चिप्समध्ये मोठी शक्ती असल्याचं ते म्हणाले.

- **- होल्ड बाईट मोदी- -**

येत्या काही वर्षांत जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठ एक ट्रिलियन डॉलर्स ओलांडण्याचा अंदाज आहे आणि भारत त्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, असं मोदी यांनी म्हटलं. २०२१ पासून मंजूर झालेल्या १० सेमीकंडक्टर प्रकल्पांमध्ये १८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

सेमीकंडक्टर उद्योग केवळ चिप उत्पादनापुरता मर्यादित नसून सरकार एक सेमीकंडक्टर परिसंस्था तयार करत आहे. जी भारताला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आणि स्वावलंबी बनवेल, असं प्रधानमंत्री मोदी यांनी म्हटलं आहे.

नोएडा आणि बेंगळुरूमधले डिझाइन केंद्र जगातील काही सर्वात प्रगत चिप्स बनवण्यावर काम करत असल्याचं ते म्हणाले.

या तीन दिवसीय परिषदेचा उद्देश भारताच्या सेमिकंडक्टर परिसंस्थेला गती देणं हा आहे. यामध्ये सेमिकॉन इंडिया कार्यक्रमाची प्रगती, स्मार्ट उत्पादन, संशोधन आणि विकास तसंच कृत्रिम बुद्धिमत्तेमधला नवोन्मेष, गुंतवणूक संधी, राज्यस्तरीय धोरण अंमलबजावणी इत्यादी विषयांवर सत्रे होतील.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यावेळी उपस्थित होते. इंडिया सेमिकंडक्टर मोहिम सुरू झाल्यापासून जग पूर्ण आत्मविश्वासाने भारताकडे पाहत असल्याचं ते म्हणाले. देशात पाच सेमिकंडक्टर युनिट्सचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. काही महिन्यांत आणखी दोन युनिट्द्वारे उत्पादन सुरू होईलं असं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><>**

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सेमीकंडक्टर प्रकल्पांपैकी एक असलेला पहिला भारतीय बनावटीचा प्रोसेसर आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सादर केला. यावेळी त्यांनी भारताच्या सेमीकंडक्टर क्षेत्रातल्या पायाभूत सुविधांबाबत सेमिकॉन इंडिया २०२५ चं उद्घाटनपर कार्यक्रमात माहिती दिली. विक्रम असं या प्रोसेसरचं नाव असून तो इसरोच्या सेमी कंडक्टर प्रयोगशाळेने विकसित केला आहे. अंतराळातल्या वातावरणीय बदलाशी जुळवून घेण्यासाठी अनुकूल पद्धतीची रचना यात करण्यात आली आहे. अजूनही पाच सेमी कंडक्टर विभागांचं काम सुरू असल्याची माहिती अश्विनी वैष्णव यांनी यावेळी दिली.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहार राज्य जीविका निधी साख सहकारी संघ लिमिटेडचं उद्घाटन केलं. बिहारच्या महिलांना कोणत्याही संधीची कमतरता भासू नये यासाठी सरकार प्रयत्न करत असल्याचं त्यांनी उद्घाटनापूर्वी बोलताना सांगितलं.

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा चीन दौरा जागतिक स्तरावर भारताचं राजनैतिक आणि धोरणात्मक अस्तित्व बळकट करण्यासाठी महत्त्वाचं पाऊल असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या चीन दौऱ्यामुळे शांघाय सहकार्य संघटनेशी भारताचे संबंध मजबूत झाले आहेत. या भेटीमुळे भारताचं स्थान आणखी बळकट होईल, असं संरक्षण मंत्र्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

<><><>

मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, मराठा आंदोलकांनी मुंबईतले रस्ते तसंच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मोकळे करायला सुरुवात केली आहे. रस्त्यात ठिकठिकाणी पार्क केलेली वाहनं हलवायला सुरुवात केली आहे. आंदोलन करताना अटी शर्तींचा भंग केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे पाटील यांना नोटीस बजावली असून त्या नोटिशीसंदर्भात जरांगे यांनी आपल्या वकिलांशी चर्चा केली. आपलं आंदोलन शांततेत आणि लोकशाहीच्या मार्गाने सुरू असून मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय आझाद मैदान सोडणार नाही, असं जरांगे पाटील यांनी स्पष्ट केलं आहे.

<><><>

सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग आज तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. ते गुरुवारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. या भेटीत लॉरेन्स राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेणार आहेत. भारत आणि सिंगापूर यांच्यातल्या द्विपक्षीय संबंधांना साठ वर्षे झाल्याच्या पार्श्वभूमीवर हा दौरा असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><>

व्हिएतनामच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांन व्हिएतनामचे परराष्ट्र मंत्री ली होअई त्रुंग यांना शुभेच्छा दिल्या. भारत आणि व्हिएतनाम यांच्यातले द्विपक्षीय संबंध अधिक बळकट होत असल्याबद्दल जयशंकर यांनी समाधान व्यक्त केलं.

<><><>

संयुक्त अरब अमिरातीसाठी भारताचे नवे राजदूत म्हणून डॉ. दीपक मित्तल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मित्तल हे १९९८च्या कॅडरचे सनदी अधिकारी आहेत.

<><><><>

अफगाणिस्तानमध्ये रविवारी झालेल्या भूकंपात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ८००च्या वर गेली आहे, तर किमान २ हजार लोक जखमी झाल्याचा अंदाज आहे. बरेच लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता असल्यानं मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे. हा भाग दुर्गम असल्यामुळं मदत आणि बचावकार्यात अडथळे येत आहेत. हेलिकॉप्टर्सच्या मदतीनं बचावकार्य सुरू आहे. ६ रिक्टर स्केल तीव्रतेच्या या भूकंपाचं केंद्र भूगर्भात ८ किलोमीटरवर होतं. याचा सर्वाधिक फटका नंगरहार आणि कुनार प्रांतांना बसला आहे, मात्र भूकंपाचे हादरे आजूबाजूच्या प्रांतांसह काबुल आणि पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादलाही जाणवले.

<><><><>

सुदानमध्ये मारा पर्वत प्रदेशात भूस्खलन होऊन एक हजारापेक्षा जास्त लोक मृत्युमुखी पडले. सुदानच्या पश्चिम भागात हे भूस्खलन झाल्याची माहिती या भागावर ताब्यात असलेल्या सुदान लिबरेशन मूव्हमेंटनं दिली. मृतदेह बाहेर काढण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी मदत करावी, अशी विनंती सुदान लिबरेशन मूव्हमेंटनं केली आहे.

<><><><>

यंदाच्या आर्थिक वर्षी एप्रिल ते ऑगस्ट दरम्यान भारतातल्या व्यावसायिक कोळसा खाणींमधलं उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत ११ पूर्णांक ८८ शतांश टक्क्यांनी वाढल्याची माहिती कोळसा मंत्रालयानं दिली आहे. यंदा कोळशाचं उत्पादन १ कोटी ४४ लाख ३० हजार टन उत्पादन नोंदवलं गेलं आहे. कोळशाच्या उत्पादनामुळे वीज निर्मिती, पोलाद उत्पादन, सिमेंट निर्मिती अशा प्रमुख उद्योगांना बळ मिळतं, त्यामुळे भारताच्या औद्योगिक पायाभूत सुविधांचा कणा मजबूत होतो, असंही मंत्रालयाने म्हटलं आहे. मंत्रालयाने या क्षेत्राच्या सुधारित कामगिरीचं श्रेय धोरणात्मक उपाययोजना, कठोर देखरेख आणि भागधारकांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याला दिलं आहे.

<><><><>

यूपीआय म्हणजे युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसनं यावर्षी ऑगस्ट महिन्यात पहिल्यांदाच वीस अब्ज व्यवहारांचा टप्पा ओलांडून एक नवीन टप्पा गाठला आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं दिलेल्या माहितीनुसार गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये अंदाजे पंधरा अब्ज व्यवहार झाले. यूपीआयने या वर्षी ऑगस्टमध्ये २४ कोटी ८५ लाख रुपयांचे व्यवहार नोंदवले. दरम्यान, वस्तू आणि सेवा कर संकलनात गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत या वर्षी ऑगस्टमध्ये साडेसहा टक्क्यांनी वाढ होऊन ते एक लाख ८६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झालं आहे. अर्थ मंत्रालयाच्या मते, निव्वळ जीएसटी संकलनातही १० पूर्णांक ७ टक्क्यांनी वाढ होऊन ते एक लाख ६६ हजार कोटी रुपये झालं आहे.

<><><><>

यूएस ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत नॅओमी ओसाका हिनं कोको गॉफ हिच्यावर ६-३, ६-२ अशी सहज मात केली. तिचा पुढचा सामना कॅरोलीना मुकोव्हा हिच्याविरुद्ध होणार आहे. पुरुष एकेरीत फीलिक्स ओजेर अलीयासीम यानं आंद्रे रुबलेव्ह याचा थेट सेट्समध्ये पराभव केला. २४ वेळा ग्रँडस्लॅम अजिंक्यपद विजेता नोव्हाक जोकोविच याच्यासमोर उद्या टेलर फ्रिट्झ याचं आव्हान असेल.

<><><><>

ऑस्ट्रेलियाचा जलदगती गोलंदाज मिचेल स्टार्क यानं टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटवर लक्ष केंद्रित करायचं असल्यानं त्यानं हा निर्णय घेतला. टी-२० प्रकारात ऑस्ट्रेलियाकडून दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक बळी घेणारा तो गोलंदाज आहे.

//<><><><>//